पुणे येथील मे. दिवाणी न्यायाधिश, वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात.

स्पेशल दिवाणी मुकदमा क्रमांक 1484/2012

1. श्री. सागर भाऊसाहेब वाघेरे,
वय – 26 वर्षे, व्यवसाय – शेती,
2. श्री. रंगनाथ भाऊसाहेब वाघेरे,
वय – 30 वर्षे, व्यवसाय – शेती,
3. सौ. भाग्यश्री सुनिल काळे,
वय – 31 वर्षे, व्यवसाय – घरकाम व शेती,
4. कु. गिता भाऊसाहेब वाघेरे
वय – 25 वर्षे, व्यवसाय – घरकाम व शेती,
क्र. 1 ते 4 राहणार – हरेकृष्ण मंगल कार्यालय,
तपोवन मंदिरासमोर, पिंपरी, पुणे–411 017. ... वादी

Orgn 21 (B)

विरुध्द

1. श्री. भाऊसाहेब गेनुजी वाघेरे,
वय – 62 वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. हरेकृष्ण मंगल कार्यालय, तपोवन मंदिरासमोर,
पिंपरी, पुणे–411 017.
2. श्री. सुधीर गेनुजी वाघेरे,
वय – 56 वर्षे, व्यवसाय – शेती,
रा. वाघेरे आळी, शिवाजी पुतळ्याजवळ, पिंपरी, पुणे–411 017.
3. सौ. कांताबाई भाऊसाहेब वाघेरे,
वय – 55 वर्षे, व्यवसाय – घरकाम व शेती,
रा. हरेकृष्ण मंगल कार्यालय, तपोवन मंदिरासमोर,
पिंपरी, पुणे–411 017.
4. श्रीमती शालन बाळासाहेब वाघेरे,

वय – 47 वर्षे, व्यवसाय – घरकाम,

5. सौ. वैशाली बाळासाहेब वाघेरे,
लग्नानंतरचे नाव – वैशाली संजय आव्हाळे,
वय – 37 वर्षे, व्यवसाय – घरकाम,
रा. आव्हाळ वाडी, ता. हवेली, जि. पुणे.

6. सारिका बाळासाहेब वाघेरे,
वय – 20 वर्षे, व्यवसाय – घरकाम,
4 व 6 रा. वाघेरे आळी, शिवाजी पुतळयाजवळ, पिंपरी, पुणे–411 017.

7. श्री. चेतन सुधीर वाघेरे,
वय – 28 वर्षे, व्यवसाय – शेती.

8. श्री. विशाल सुधीर वाघेरे,
वय – 24 वर्षे, व्यवसाय – शेती.

9. सौ. अलका सुधीर वाघेरे,
वय – 55 वर्षे, व्यवसाय – घरकाम,
7 ते 9 रा. वाघेरे आळी, शिवाजी पुतळयाजवळ, पिंपरी, पुणे–411 017.

10. सौ. पल्लवी प्रविण शिंदे,
वय – 33 वर्षे, व्यवसाय – घरकाम,
रा. भैरवनाथ मंदिराजवळ, पिंपरी गाव, पुणे–411 017.

11. सौ. ऊर्मिला दत्तात्रय दाभाडे,
वय – 40 वर्षे, व्यवसाय – घरकाम,
रा. तळेगाव दाभाडे, ता. मावळ, जि. पुणे.

12. श्री.उदय भाऊसाहेब वाघेरे,
वय – 43 वर्षे, व्यवसाय – सुखवस्तु,

13. श्री.किरण भाऊसाहेब वाघेरे,
वय – 32 वर्षे, व्यवसाय – सुखवस्तु,
12 व 13 रा. हरेकृष्ण मंगल कार्यालया जवळ,
तपोवन मंदिरासमोर, पिंपरी, पुणे–411 017.

14. ओम डेव्हलपर्स,
भागीदारी संस्था
ऑफीस पत्ता – एस. पी. हाईटस, दुसरा मजला,

मुंबई–पुणे हायवे, कासारवाडी, पुणे–411 034.
तर्फे भागीदार म्हणून –

1. श्री. श्रीचंद शामनदास आसवानी,
   वय – 39 वर्षे, व्यवसाय – व्यापार,
   रा. एच. बी. 1/8, पिंपरी, पुणे–411 017.
2. श्री. धनजीभाई मोहनभाई काबरिया
   वय – 61 वर्षे, व्यवसाय – व्यापार,
   रा. जी–301, श्रीजी पॅरॉडाईज, डी.पी.रोड,
   औंध, पुणे–411 007.

15. श्री. दैविदास बबनराव बहिरट,
वय – 43 वर्षे, व्यवसाय – व्यवसाय,
रा. 1103, सदाशिव पेठ, पुणे–30.

16. पार्वती उर्फ तान्हुबाई बबनन भोंडवे,
वय – सज्ञान, धंदा – गृहिणी,
रा. 328, गुरुवार पेठ, मला मार्केटजवळ, पुणे.

17. शांताबाई भगवंता परांडे,
वय – सज्ञान, धंदा – घरकाम,
रा. मु.पो. धानोरी गावठाण, धानोरी, पुणे–411 015.

18. रजनी कैलास सातव
वय – सज्ञान, धंदा – घरकाम,
रा. मु.पो. आव्हाळवाडी, वडजाई रस्ता,
ता. हवेली, जिल्हा – पुणे.

19. चंद्रभागा शंकर साठे मयत तर्फे वारस
अे. श्री. बाळासाहेब शंकर साठे,
   वय – सज्ञान, धंदा – सुखवस्तु,
बी. श्री. सतीश शंकर साठे,
   वय – सज्ञान, धंदा – सुखवस्तु,
सी. श्री. शाम शंकर साठे,
   वय – सज्ञान, धंदा – सुखवस्तु,
डी. श्री. संतोष शंकर साठे,

वय – सज्ञान, धंदा – सुखवस्तु.
क. 19 अे ते 19 डी रा. पिंपळे निलख,
पोस्ट औंध कॅम्प, पुणे–411 027.

ई. नंदा चंद्रकांत तापकीर
वय – सज्ञान, धंदा – घरकाम,
रा. मु. पो. च–होली, ता. हवेली,जिल्हा – पुणे.

एफ. सुनिता बाळासाहेब बडदे
वय – सज्ञान, धंदा – घरकाम,
रा. मु. पो. हडपसर, ता. हवेली, जिल्हा – पुणे.

20. सीताबाई दशरथ शिंदे मयत तर्फे वारस –

अे. श्री. विनोद दशरथ शिंदे
वय – सज्ञान, धंदा – सुखवस्तु.

बी. श्री. नामदेव दशरथ शिंदे
वय – सज्ञान, धंदा – सुखवस्तु.
क. 20 अे व 20 बी रा. संगमवाडी
ता. हवेली, जि. पुणे.

21. सुभद्रा महादेव कस्पटे मयत तर्फे वारस –

अे. श्री. दिनकर महादेव कस्पटे
वय – सज्ञान, धंदा – सुखवस्तु.

बी. श्री. हिरामण महादेव कस्पटे
वय – सज्ञान, धंदा – सुखवस्तु.

सी. श्री. बाळासाहेब महादेव कस्पटे
वय – सज्ञान, धंदा – सुखवस्तु.
क 21 अे व 21 सी रा. कस्पटेवस्ती, वाकड,
ता. मुळशी, जि. पुणे.

डी. सविता सर्जेराव सातव
वय – सज्ञान, धंदा – गृहिणी,
रा. मु. पो. वाघोली, ता. हवेली, जिल्हा – पुणे.

22. मे. सिध्दी विनायक डेव्हलपर्स भागीदारी संस्था
यांचे कार्यालय एच. बी. 21/8, पिंपरी, पुणे 411017.

तर्फे भागीदार म्हणून श्री. सतीश मोहनदास रोहरा
वय 36 वर्षे, धंदा व्यापार
रा. एच. बी. 21/8, पिंपरी, पुणे 411017.

23. सौ. वृषाली देवीदास बहिरट
वय 40 वर्षे, धंदा घरकाम

24. कु. अदिश देवीदास बहिरट अज्ञान तर्फे अ पा क
देविदास बबनराव बहिरट
वय 12 वर्षे, धंदा शिक्षण
नं. 23 व 24 रा. 1103, सदाशिव पेठ, पुणे. 411030.

— प्रतिवादी

दावा — वाटपासाठी, ठराव व ताकीद तसेच वाटप पत्र मान्यता पत्रे खरेदीखते रद्द करून मिळणेबाबत कोर्ट फी स्टॅम्प 3,00,000/- दावा रे. कि. 17,58,80,000/-

या कामी वादीतर्फे मे. कोर्टास नम्रपणे कळवितात ते खालीलप्रमाणे—

1. मिळकतीचे वर्णन :— पुणे तुकडी पोट तुकडी तालुका हवेली तसेच जिल्हा पुणे यांचे हद्दीतील

अ. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील गाव मौजे पिंपरी वाघेरे येथील जमीन मिळकत स.नं. 11/2/1 यांसी क्षेत्र 07 हेक्टर 50 आर यांसी आकार रक्कम रूपये 58.59 पैसे या पैकी आज मितीस शिल्लक असलेले क्षेत्र 1 हे 78. 896 आर आकार 13 रु. 49 पैसे.

आ. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील गाव मौजे रावेत येथील जमीन मिळकत स.नं. 100 हिस्सा नं. 1/2 यांसी क्षेत्र 00 हेक्टर 69 आर अधिक पोट खराबा 00 हेक्टर 11 आर यांसी एकूण क्षेत्र 00 हेक्टर 80 आर यांसी आकार रक्कम रूपये 03.26 पैसे

अ. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील गाव मौजे रावेत येथील जमीन मिळकत स.नं. 149 हिस्सा नं. 1अ यांसी क्षेत्र 02 हेक्टर 13 आर अधिक पोट खराबा 00 हेक्टर 03 आर यांसी एकूण क्षेत्र 02 हेक्टर 16 आर यांसी आकार रक्कम रुपये 11.00 पैसे पैकी क्षेत्र 01 हेक्टर 33 आर आकार 6 रु. 77 पैसे यांसी चतुःसीमा खालीलप्रमाणे :–

पूर्वेस – श्री बबनराव भोंडवे यांची जमीन
दक्षिणेस – बाळु दामु भोंडवे व बबन नामदेव भोंडवे यांची जमीन
पश्चिमेस – नामदेव भोंडवे यांची जमीन
उत्तरेस – पांडुरंग,पोपट,पिठोबा, बाळु भोंडवे यांची जमीन

उ. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील गाव मौजे रावेत येथील जमीन मिळकत स.नं. 100 हिस्सा नं. 1/1 यांसी क्षेत्र 00 हेक्टर 10 आर यांसी आकार रक्कम रुपये 00.63 पैसे यांसी चतुःसीमा खालीलप्रमाणे :–

पूर्वेस – श्री भोईर व भोंडवे यांची जमीन
दक्षिणेस – श्री भोईर व भोंडवे यांची जमीन
पश्चिमेस – स.न 99 ची जमीन मिळकत
उत्तरेस – रेल्वे लाईन

ई. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील गाव मौजे रावेत येथील जमीन मिळकत स.नं. 150 हिस्सा नं. 2/1 यांसी क्षेत्र 00 हेक्टर 56 आर अधिक पोट खराबा 00 हेक्टर 03 आर यांसी एकूण क्षेत्र 00 हेक्टर 59 आर यांसी आकार रक्कम रुपये 03.88 पैसे पैकी क्षेत्र 00 हेक्टर 40 आर आकार 2 रु. 63 पैसे यांसी चतुःसीमा खालीलप्रमाणे :–

पूर्वेस – सुधाकर भोंडवे व मुळ मालकांचे क्षेत्र
दक्षिणेस – प्रतिवादी नं. 1 व 2 चे नावे खरेदी घेतलेले क्षेत्र
पश्चिमेस – श्री नामदेव केनु भोंडवे यांची जमीन
उत्तरेस – टेल्को सोसायटीची जमीन

एफ. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील गाव मौजे रावेत येथील जमीन मिळकत स.नं. 150 हिस्सा नं. 2/2 यांसी क्षेत्र 00 हेक्टर 20 यांसी आकार रक्कम रुपये 01.25 पैसे

जी. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील गाव मौजे रावेत येथील जमीन मिळकत स.नं. 97 हिस्सा नं. 1अ+1अ+1 यांसी क्षेत्र 05 हेक्टर 64 आर अधिक पोट खराबा 00 हेक्टर 20 आर यांसी एकूण क्षेत्रा 05 हेक्टर 84 आर यांसी आकार रक्कम रुपये 23.37 पैसे पैकी 00 हेक्टर 60 आर यांसी आकार 3 रु. 20 पैसे चतुःसीमा खालीलप्रमाणे :-

पूर्वेस – ओढा
दक्षिणेस – सर्व्हे नंबर पैकी उर्वरीत जमीन
पश्चिमेस – सर्व्हे नंबर पैकी उर्वरीत जमीन
उत्तरेस– रेल्वे लाईन

एच. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील गाव मौजे रावेत येथील जमीन मिळकत स.नं. 101 हिस्सा नं. 1 यांसी क्षेत्र 04 हेक्टर 24 आर अधिक पोट खराबा 00 हेक्टर 20 आर यांसी एकूण क्षेत्र 04 हेक्टर 44 आर यांसी आकार रक्कम रुपये 20.87 पैसे यांसी चतुःसीमा खालीलप्रमाणे :-

पूर्वेस – स.न.150,149 व 102/2 ची जमीन
दक्षिणेस – स.न. 102 ची जमीन
पश्चिमेस – स.न. 144, 145 ची जमीन
उत्तरेस– स.न. 100 व 99 ची जमीन

आय. पंचायत समिती हवेली , जिल्हा परिषद पुणे यांचे अधिकार क्षेत्रातील गाव मौजे आव्हाळवाडी येथील जमीन मिळकत गट नं. 917/2 क्षेत्र 02 हेक्टर 05 आर यांसी आकार रक्कम रुपये 05.00 पैसे

जे. पंचायत समिती हवेली , जिल्हा परिषद पुणे यांचे अधिकार क्षेत्रातील गाव मौजे आव्हाळवाडी येथील जमीन मिळकत गट नं. 919 क्षेत्र 01 हेक्टर 95 आर यांसी आकार रक्कम रुपये 04.67 पैसे

के. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील गाव मौजे पिंपरी वाघेरे येथील तपोवन रस्ता येथे दगड विट मातीमधिल सिमेंट प्लास्टर रुफ सिमेंट पत्रा यांचे सहाय्याने बांधकाम केलेली 16 खोल्या असलेली इमारत मिळकत/चाळ यांसी मिळकत क्र. 14/38 यांचे मोजमाप पुर्व पश्चिम 67 फुट व दक्षिणोत्तर 26.6 फुट सदर इमारतीस दक्षिण व उत्तरेस दरवाजे असत

एल. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील गाव मौजे पिंपरी वाघेरे येथील तपोवन रस्ता येथे दगड विट मातीमधील सिमेंट प्लास्टर रुफ मंगलोरी कौले यांचे सहाय्याने बांधकाम केलेली 1 खोली असलेली मिळकत यांसी मिळकत क्र. 3/888

वर नमूद केलेल्या जमिन मिळकती व इमारत मिळकती या प्रस्तुत दाव्याचा विषय असून त्याचा येथून पुढे संक्षेपाने उल्लेख 'सदर दावा मिळकती' असा केलेला आहे.

2. सदर वादी मे. कोर्टास विनंतीपूर्वक कळवितात की, वादी व प्रतिवादी क्रमांक 1 ते 10 यांचे मूळ पुरुष गेनुभाऊ हरीभाऊ वाघेरे हे होते. सदर गेनुभाऊ हरीभाऊ वाघेरे यांना तीन मुले व सहा मुली अशी आपत्ये होती. सदर प्रतिवादी क्र. 1 व 2 आणि प्रतिवादी क्र. 4 यांचे पती, प्रतिवादी क्र. 5 व 6 यांचे वडील मयत बाळासाहेब अशी गेनुभाऊ हरीभाऊ वाघेरे यांची मुले होती. वादी हे प्रतिवादी क्र. 1 व प्रतिवादी क्र. 3 यांची मुले आहेत. तर प्रतिवादी नं. 16 ते 21 या मुली असून त्यांचेपैकी चंद्रभागा शंकर साठे, सिताबाई दशरथ शिंदे व सुभद्रा महादेव कस्पटे या मयत असून त्यांचे वारसांना दाखल पक्षकार केलेले आहे. प्रतिवादी क्र. 2 हे प्रतिवादी क्र. 10 यांचे पती असून प्रतिवादी क्र. 7 ते 9 ही प्रतिवादी क्र. 2 व 10 यांची मुले

आहेत. वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 10 यांच्या दरम्यानचा नातेसंबंध दर्शविणारा वंशावेल परिशिष्ट 'अ' मध्ये दर्शविल्याप्रमाणे आहे.

3. वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 9 यांचे एकत्र कुटुंबाची गाव मौजे पिंपरी वाघिरे येथे दावा कलम 1अ मध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत होती.सदर जमीन मिळकतीमधील काही क्षेत्र प्रतिवादी क्र. 1, 2, प्रतिवादी क्र. 4 ते 6 व मयत गेनुभाऊ हरीभाऊ वाघेरे यांनी वेगवेगळया लोकांना नोंदणीकृत खरेदीखताने सन 1989 ते 1996 चे सुमारास विक्री केलेले होते. व सदर जमिनीचे विक्रीमधून आलेली मोबदला रक्कम प्रतिवादी क्र. 1 तसेच प्रतिवादी क्र.2 व प्रतिवादी क्र. 4 ते 6 या कुटुंबातील घटक कुटुंबाच्या सदस्यांना त्याचवेळेस त्या घटक कुटुंबाच्या सदस्यांकरिता वाटप करून दिलेली होती व आहे.

4. सदर वादी मे. कोर्टास कळवितात की, वादी व प्रतिवादी क्रमांक 1 ते 9 यांचे मूळ पुरूष गेनुभाऊ हरिभाऊ वाघेरे यांचे दिनांक 20/02/1992 रोजी निधन झाले असून त्यांनी त्यांच्या मृत्युपूर्वी दिनांक 01 जुलै 1988 रोजी दावा जमीन मिळकत म्हणजेच वर कलम 1अ या मधील जमीन मिळकतीमधील त्यांचा संपूर्ण अविभक्त हिस्सा प्रतिवादी क्र. 1 व 2 यांना मृत्युपत्रानुसार दिलेला आहे. कै. गेनुभाऊ हरीभाऊ वाघेरे यांच्या सर्व मुलींची लग्ने/ विवाह हे सन 1994 पूर्वीच संपन्न झालेले आहेत. तसेच ते इच्छापत्र करून मयत झालेले असल्यामुळे त्यांचे पश्चात त्यांच्या हिश्याच्या संपूर्ण मिळकतीस हिंदू वारसा कायद्याच्या तरतुदी लागू होत नसल्याने त्यांचे मुलींना सदर जमीन मिळकतीमध्ये कसलाही कायदेशीर हक्क व अधिकार प्राप्त होणारा नव्हता व नाही.

5. सदर वादी मे. कोर्टास कळवितात की, दावा जमीन मिळकत दावा कलम 1अ यामधील वडिलार्जित जमीन मिळकतीची विक्री केल्यानंतर प्राप्त झालेल्या मोबदला रक्कमेचे वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्र. 1 व 2 तसेच मयत बाळासाहेब यांचे घटक कुटुंबाकरिता प्रतिवादी क्रमांक 4 ते 6 यांना मोबदला रक्कमेचे वाटप करून देण्यात आले व त्या वाटपामध्ये वादी व प्रतिवादी क्र. 1 यांचे घटक कुटुंब व प्रतिवादी क्र. 2 यांचे घटक कुटुंबिय

यांचेकरिता मिळालेल्या रक्कमेमधून गाव मौजे रावेत येथील दावा कलम 1 ब ते 1जी तसेच गाव मौजे वाघोली येथील दावा कलम 1 आय ते 1 जे मध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकती प्रतिवादी नं. 1 व 2 यांचे नावे खरेदी घेण्यात आलेल्या होत्या व आहेत. सबब सदर दावा जमीन मिळकतीमध्ये वादी, प्रतिवादी क्र. 1, प्रतिवादी क्र. 3 व प्रतिवादी क्र. 2 व त्यांचे सर्व कुटुंबिय म्हणजेच प्रतिवादी नं. 7 ते 10 यांना कायदेशिर मालकीहक्क व अधिकार प्राप्त झालेले होते व आहेत. मुळात सदर जमीन मिळकती वर नमूद केल्याप्रमाणे एकत्र कुटुंबातील जमीन मिळकतीची विक्री करून आलेल्या रक्कमेमधून प्रत्येक घटक कुटुंबाचे हिस्यास घटक कुटुंबाकरीता वाटप करून देण्यात आलेल्या रक्कमेमधून खरेदी घेतलेल्या होत्या व आहेत.

6. सदर वादी मे. कोर्टास कळवितात की, प्रतिवादी क्र. 1 हे वादी यांचे जनक वडील व प्रतिवादी क्र. 3 ही आई आहे. प्रतिवादी क्र. 1 व 3 यांचा विवाह हिंदू रितीरिवाजानुसार दि. 4 एप्रिल 1963 रोजी संपन्न झालेला असून सदर विवाहसंबंधातून त्या दोघांना सर्व वादी ही अपत्ये झालेली आहेत. सबब वादी त्यांचे औरस पुत्र व औरस मुली आहेत. प्रतिवादी क्र. 1 यांचा प्रतिवादी क्र. 3 हिच्याशी विवाह झालेला असताना देखील प्रतिवादी क्र. 1 यांना कै. सुनदा यांचेपासून प्रतिवादी क्र. 11 ते 13 ही अपत्ये झालेली आहेत. सबब प्रतिवादी क्र. 11 ते 13 यांना वडिलार्जित दावा कलम 1 मधिल तसेच सदर मिळकतीचे मधिल क्षेत्राची विक्री करून आलेल्या पैशाचे प्रतिवादी नं. 1, 2, व 4 ते 6 यांचे घटक कुटुंबास वाटप करून झालेनंतर त्या रकमे मधुन वादी व प्रतिवादी नं. 1 व 3 यांचे घटक कुटुंब व प्रतिवादी नं. 2 व 7 ते 10 यांचे घटक कुटुंब यांचे वाटयास आलेल्या रक्मेतुन दावा कलम 1 बी ते 1जी व 1 आय व 1 जे या जमीन मिळकती खरेदी घेतलेल्या असल्यामुळे या मिळकतीमध्ये कसल्याही प्रकारे कायदेशीर हक्क व अधिकार कदापि प्राप्त होणारे नव्हते व नाहीत.

7. सदर वादी मे. कोर्टास कळवितात की, सदर प्रतिवादी क्र. 11 ते 13 यांना दावा मिळकतीमध्ये कसल्याहीप्रकारे कायदेशिर हक्क व अधिकार ते अनौरस असल्याने प्राप्त होणार नाहीत. याची प्रतिवादी क्र. 11 ते 13 यांना पूर्ण

कल्पना माहिती व जाणिव प्रथम पासून होती, त्यामुळे तसेच वादी यांचे दावा मिळकतीमध्ये कायदेशीर मालकीहक्क व अधिकार डावलण्याकामी प्रतिवादी क. 12 व 13 यांनी प्रतिवादी क. 1, 2, 7 व 8 यांच्याशी संगनमत करुन दावा कलम 1 बी ते 1जी व 1एच यामधील मिळकतीसंदर्भात प्रतिवादी क. 14, 15 व 22 यांच्याशी संगनमत करुन खरेदीखताचे बेकायदेशीर दस्तऐवज बनावट कागदपत्राच्या सहाय्याने अस्तित्वात आणलेले आहेत ते सर्व दस्त मूलतः बेकायदेशीर असून ते वादी यांचेवर तसेच दावा कलम 1बी ते 1जी व 1एच यामधील वादींच्या अविभक्त हिश्यावर कदापि बंधनकारक नव्हते व नाहीत.

8. वादी व प्रतिवादी क. 1 ते 10 यांचे दरम्यान दावा जमीन मिळकत 1अ यामधील जमीन मिळकतीचे सरस निरस मानाने तोंडी अथवा लेखी वाटप कधीही झालेले नव्हते व नाही. तसेच दावा कलम 1बी ते 1जे या जमीन मिळकतीचे देखील वादी व प्रतिवादी क. 1 ते 3 व 7 ते 10 यांचे दरम्यान आजतागायत सरस निरस मानाने तोंडी अथवा लेखी वाटप झालेले नाही. त्यामुळे प्रतिवादी क. 1 व प्रतिवादी क. 2 यांना दावा कलम 1ब ते 1 जी व 1एच या जमीन मिळकतीमधील कोणतेही निश्चित असे क्षेत्र प्रतिवादी क. 14 यांस विक्री करण्याचा हक्क व अधिकार नव्हता व नाही व अशी संपूर्ण जमीन मिळकत विक्री करण्याकामी कधीही कायदेशीर गरज निर्माण झालेली नव्हती व नाही. असे असतांना देखील प्रतिवादी क. 1, 2 यांनी प्रतिवादी क. 7, 8, 12 व 13 यांच्याशी संधान साधून प्रतिवादी क. 14 यांचेशी संगनमत करुन दावा जमीन मिळकत 1बी ते 1जी व 1एच या जमीन मिळकतीबाबत मे. सहदुय्यम निबंधक हवेली क. 17 पुणे यांचे कार्यालयात तथाकथित पोकळीस्त बेकायदेशीर खरेदीखताचे दस्तऐवज नोंदविलेले असून सदर दस्तऐवज नोंदण्यापूर्वी तथाकथित मान्यतापत्राचे बेकायदेशीर व पोकळीस्त दस्त सदर कार्यालयात नोंदविलेले आहेत सदरचे सर्व दस्त मे. दुय्यम निबंधक हवेली क. 17 पुणे यांचे कार्यालयात नोंदविलेले असून त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| अ. क. | मिळकत क. | मान्यतापत्र दस्त | खरेदीखत दस्त |
|---|---|---|---|
| 1. | स. नं. 150/2/2 | दस्त क. 753/09 | दस्त क.759/09 |

| | | | |
|---|---|---|---|
| | क्षेत्र 20 आर | | रु.रू. 50,00,000/- |
| 2. | स.नं.160/2/1 क्षेत्र 40 आर | दस्त क्र. 754/09 | दस्त क्र.760/09 रु.रू. 1,00,00,000/- |
| 3. | स. नं. 149/1अ क्षेत्र 01 हे. 33 आर | दस्त क्र. 755/09 | दस्त क्र.761/09 रु.रू. 3,32,50,000/- |
| 4. | स. नं. 100/1/1 क्षेत्र 10 आर | दस्त क्र. 756/09 | दस्त क्र.764/09 रु.रू. 25,00,000/- |
| 5. | स. नं. 101/1 क्षेत्र 02 हे. 00 आर | दस्त क्र. 757/09 | दस्त क्र.762/09 रु.रू. 5,00,00,000/- |
| 6. | स. नं. 100/1/2 क्षेत्र 80 आर | दस्त क्र. 758/09 | दस्त क्र.763/09 रु.रू. 2,00,00,000/- |

वर नमूद केलेले सर्व दस्त हे मुलतः बेकायदेशीर असून वादी यांच्या दावा जमीन मिळकतीमधील हिश्यावर कायदेशीररित्या बंधनकारक नाहीत. तसेच त्याद्वारे प्रतिवादी क्र. 14 यांस दावा जमीन मिळकतीमध्ये कायदेशीर मालकी हक्क व अधिकार प्राप्त होणारे नव्हते व नाहीत तसेच वादी यांचे दावा मिळकती मधील कायदेशीर मालकी हक्क व अधिकार कदापी संपुष्टात येणारे नव्हते व नाहीत.

9. सदर वादी मे. कोर्टास कळवितात की, दावा जमीन मिळकत 1एच ही मुळात रखमाजी बाळा भोंडवे यांचे मालकीची होती त्यांचे पश्चात त्यांना केवळ दोन मुली म्हणजेच यमुनाबाई तुकाराम बहिरट व लक्ष्मीबाई गेनुभाऊ वाघेरे अशा वारस होत्या. सदर दावा जमीन मिळकतीचे म्हणजे वर कलम 1एच मधील मिळकतीचे यमुनाबाई तुकाराम बहिरट व लक्ष्मीबाई गेनु वाघेरे यांचे दरम्यान तोंडी वाटप होवून त्यामधील पूर्व बाजूकडील 5 एकर 22 गुंठे क्षेत्र लक्ष्मीबाई गेनु वाघेरे यांना तर पश्चिमेकडील 5 एकर 22 गुंठे क्षेत्र यमुनाबाई तुकाराम बहिरट हिस देण्यात आले व त्याप्रमाणे सदर जमिनीत त्यांची ताबेवहिवाट होती परंतु त्याप्रमाणे 7/12 सदरी अंमल करण्याची व लक्ष्मीबाई गेनु वाघेरे यांच्या भावाची नोंद करण्याचे राहून गेले होते असे असले तरी त्यांना सदर दावा मिळकतीमध्ये प्रत्येकी 5 एकर 22 गुंठे

क्षेत्रावर कायदेशीर मालकीहक्क व अधिकार होते. यमुनाबाई तुकाराम बहिरट यांचा प्रतिवादी क्रमांक 15 हा नातु आहे तर लक्ष्मीबाई गेनुभाऊ वाघिरे यांना प्रतिवादी क्र. 1, 2 व मयत बाळासाहेब गेनुभाऊ वाघेरे अशी तीन मुले तर प्रतिवादी नं. 16 ते 21 या मुली अशी अपत्ये असल्याने सदर जमीन मिळकत प्रतिवादी क्र. 1, 2 व 4 ते 6 व प्रतिवादी नं. 16 ते 21 यांना वारस हक्काने मिळालेली होती. सदर जमीन मिळकत प्रतिवादी क्र. 1 व 2 व त्यांचे कुटुंबीय म्हणजेच वादी व प्रतिवादी क्र.1, 2, 3, 7 ते 10 हे कसत व वहिवाटत होते व आहेत. सदर जमीन मिळकतीची मेहनत व मशागत तसेच सुधारणा ही प्रतिवादी क्र. 1 व प्रतिवादी क्र. 2 यांच्या नावे असलेल्या दावा कलम 1 अ मधील मिळकती मधून येणाऱ्या उत्पन्नामधून केलेली होती व आहे. सबब सदर जमीन मिळकतीमध्ये देखील वादीस कायदेशीर मालकीहक्क व अधिकार प्राप्त झालेले होते व आहेत.

10. सदर दावा कलम 1 एच या जमीन मिळकतीचे देखील वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 10 व 16 ते 21 यांचे दरम्यान आजतागायत सरस निरस मानाने तोंडी अथवा लेखी वाटप झालेले नाही, तसेच सदर जमीन मिळकतीमध्ये देखील प्रतिवादी क्र. 11 ते 13 यांना हक्क व अधिकार कायद्याने प्राप्त होणारे नव्हते व नाही याची स्पष्ट कल्पना व जाणीव प्रतिवादी नं. 12 व 13 यांना असल्याने त्यांनी प्रतिवादी क्र. 1 व 2 आणि प्रतिवादी क्र. 14, 15 व 22 यांचेबरोबर संगनमत केले व दावा जमीन मिळकत 1एच यामधील जमीन मिळकतीबाबत एक पोकळीस्त स्वरूपाचा वाटणीपत्राचा दस्त मे. दुय्यम निबंधक हवेली क्र. 17 पुणे यांचे कार्यालयात अनुक्रमांक 10824 / 2007 वर नोंदवून अस्तित्वात आणला व पुढे सदर दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. 12 याने सदर तथाकथित वाटपपत्राच्या दस्ताद्वारे स्वतःचे नाव प्रतिवादी क्रमांक 1 व 2 यांचे नावासह लावून घेतले. वास्तवात सदर दावा जमीन 1एच या मध्ये मयत लक्ष्मीबाई गेणु वाघीरे हिचा हिस्सा 5 एकर 22 गुंठे एवढा होता व तिचे मृत्युपश्चात वर नमूद केलेप्रमाणे स्थिती असल्यामुळे वादी, प्रतिवादी क्र. 1 ते 10 व 16 ते 21 यांना कायदेशीर मालकी हक्क व अधिकार सदर क्षेत्रावर प्राप्त झालेले होते व आहेत असे असतांना सदर प्रतिवादी क्र. 1 व 2, 12 व 15 यांनी संगनमताने वाटपपत्राचा बेकायदेशीर

अथवा त्यामधील भागासंदर्भात कसलाही व्यवहार कोणाचेही बरोबर कधीही केलेला नसताना सदर प्रतिवादी क्र. 1, 2, 12 वे 15 यांनी संगनमताने सदर दावा जमीन मिळकत 1एच मधील 4 एकर क्षेत्रासंदर्भात देखील पोकळीस्त व बेकायदेशीर बॅक डेटेड खोटे दस्तऐवज सदर संपूर्ण क्षेत्र लुबाडण्याकामी अस्तित्वात आणल्याचे सदर वादी यांना हल्ली माहिती घेतली असता खात्रीशीररित्या कळलेले आहे. यावरून प्रतिवादी क्र. 12 ते 15 हे सदर जमीन मिळकत क्षेत्र लुबाडण्याच्या इरादयाने कोणत्याही स्थरास जाणारे इसम आहेत हे स्पष्टरित्या उघड व शाबित होत आहे. तसेच प्रतिवादी नं. 15 यांस दावा कलम 1एच मध्ये 5 एकर 22 गुंठे क्षेत्रावरच केवळ मालकी प्राप्त होत असतांना देखील प्रतिवादी क्र. 1, 2, 12 व 15 यांनी संगनमताने प्रतिवादी नं. 15 यांनी सदर दावा मिळकती मधील क्षेत्रापैकी 4 एकर क्षेत्राबाबत श्री. नंदकुमार भोंडवे यांस मोबदला स्विकारून दस्तऐवज करून दिलेले असताना सदर बाब देखील लपवून ठेवून, सदर प्रतिवादी क्र. 15 यास 6 एकर क्षेत्र सदर दावा मिळकतीत वाटप करून दिल्याबाबतचा वर नमूद बेकायदेशीर वाटपाचा दस्त अस्तित्वात आणला व त्याद्वारे सदर मिळकतीमधील 00 हेक्टर 84 आर जमीन प्रतिवादी क्र. 22 यास दुय्यम निबंधक हवेली नं. 5 पुणे यांचे कार्यालयात तथाकथीत नोंदणीकृत दस्त क्रमांक 4273/2011 अन्वये रक्कम रु. 5,51,00,000/- या किंमतीस तबदिल केलेबाबतचा तथाकथीत खरेदीखताचा दस्त प्रतिवादी नं. 12 14 व 15, 23 व 24 यांच्या संगनमताने अस्तित्वात आणला. वास्तवात सदर प्रतिवादी क्र. 15 यांस सदर दावा जमीन मिळकतीमध्ये केवळ 05 एकर 22 आर जमीन मिळकत मालकी हक्काने मिळणारी होती व त्यातील ही 4 एकर जमीन त्यांनी श्री. भोंडवे यांस मोबदल्याचे बदल्यात प्रदान केलेली होती. सबब अशा परिस्थितीत प्रतिवादी क्र. 15 यांना प्रतिवादी क्रमांक 22 यांस 02 एकर 04 आर म्हणजेच 84 आर क्षेत्र विक्री करण्याचा कायदेशीर हक्क व अधिकार नसताना देखील खरेदीखताचा दस्त मूलतः बेकायदेशीरपणे अस्तित्वात आणलेला आहे, सबब तो देखील रद्द होण्यास पात्र आहे.

12. सदर वादी मे. कोर्टास कळवितात की, सदर वादी यांना प्रतिवादी यांच्या कटकारस्थानाची काहीएक माहिती नव्हती. सदर वादी यांनी दावा जमीन मिळकतीचे संदर्भात हल्ली गाव जमीन मिळकतीचे संदर्भात मे 2011 चे सुमारास 7/12 चे उतारे मिळविले असता प्रतिवादी क. 1 व 2 यांची नावे कमी करुन प्रतिवादी क्र. 9 यांच्या नावाची नोंद दावा जमीन मिळकतीचे 7/12 सदरी झाल्याचे या वादी यांना निदर्शनास आले. सबब त्यास अनुसरुन वादी यांनी त्या संदर्भातील फेरफार उतारे तसेच सदर फेरफार उताऱ्यावरुन प्रतिवादी क. 1, 2 व 12 ते 15 यांनी अस्तित्वात आणलेले तथाकथित दस्तऐवज यांच्या प्रती मिळविल्या असता सदर इसमांनी सदरचे कृत्य वादी यांची मिळकत लुबाडण्याकामी व सदर मिळकतीमधील वादी यांचे कायदेशीर हक्क व अधिकार डावलणे कामी अस्तित्वात आणल्याचे या वादीच्या निदर्शनास आले. सबब त्याबाबत सदर वादी यांनी प्रतिवादी क. 1, 2, 7, 8 व 12 ते 15 यांचेकडे विचारणा केली असता प्रतिवादी क. 12 यांनी वादी यांना असे सांगितले की, दावा जमिन मिळकतीची विक्री प्रतिवादी क. 14 यांस केलेली नसून केवळ जमीन सरकारने जप्त करु नये म्हणून प्रतिवादी क.14 चे नावे केलेली आहे. सदर व्यवहार खरेदीचा नाही त्यांना मालकीहक्क व तावा बेनिफिशयल इंटरेस्ट तब्दील केलेला नाही. सदर जमीन मिळकत कागद उलटून आपले नावे करुन घेणार आहोत. सदरचे काम सात आठ महिन्यात करुन घेवून मिळकतीचा कागद उलटून घेवू असे सांगितले असता त्यावर वादी यांनी विश्वास ठेवला.

13. वादी मे. कोर्टास कळवितात की, त्यानंतर प्रतिवादी क. 12 व 14 यांचेकडून काहीच हालचाल न झाल्याने त्याबाबत वादीने प्रतिवादी क. 1, 2, 7, 8, 12, 13 व 14 यांना विचारणा केली असता आम्ही त्याच प्रयत्नात आहोत लवकरच करुन घेणार आहोत अशी मिळमिळीत उत्तरे देवून चाल ढकल केली. यावरुन सदर प्रतिवादी क. 1, 2, 7, 8, 12, 13, 14, 15 व 22 यांचा हेतू, इरादा स्वच्छ नसल्याचे व सदरचे संपूर्ण कृत्य त्यांनी वादी यांचे कायदेशीर हक्क व अधिकार डावलण्याकामी केलेले असल्याची वादी यांची पूर्ण खात्री झालेली आहे. सबब वादी यांना सदरचा दावा प्रतिवादी यांचे विरुध्द त्यांचे दावा मिळकतीमधील अविभक्त हिस्याचे क्षेत्राचे वाटप करुन

मिळणेकामी तसेच प्रतिवादी यांनी दावा मिळकती संदर्भात अस्तित्वात आणलेले तथाकथित बेकायदेशीर खरेदीखताचे दस्त व वाटपाचा दस्त हे वादी यांचे दावा मिळकतीमधील हिश्यावर हक्क व अधिकारावर बंधनकारक नाहीत असा ठराव करून मिळणेकामी तसेच निरंतर मनाईकामी दाखल करणे भाग पडलेले आहे.

14. सदर वादी मे. कोर्टास कळवितात की, दावा कलम 1एच यामध्ये वर्णन केलेली जमीन मिळकत म्हणजेच गाव मौजे रावेत येथील स.नं. 101 हिस्सा नंबर 1 यामधील पूर्व बाजूकडील 05 हेक्टर 22 आर एवढे क्षेत्र वादी यांची आजी व प्रतिवादी क्र. 1, 2 तसेच 16 ते 21 आणि मयत बाळासाहेब वाघेरे यांची आई लक्ष्मीबाई हिला मालकीहक्काने तिचे माहेरकडील प्रॉपर्टी म्हणून मालकीहक्काने ताबेवहिवाटीत मिळालेली होती व तिचे ताबेवहिवाटीत मालकीहक्काने पूर्वीपासून होती. तिचे मृत्युपश्चात वर नमूद केल्याप्रमाणे तिचे मुले व मुली वारस असल्याने व वर नमूद केल्याप्रमाणे स्थिती असल्याने सदर दावा जमीन मिळकतीमध्ये वादी प्रतिवादी क्र. 1 ते 10 तसेच प्रतिवादी क्र. 16 ते 21 यांना कायदेशीर मालकीहक्क व अधिकार प्राप्त झालेले होते व आहेत. सदर मिळकतीची सदर वादी प्रतिवादी क्र. 1 ते 10 व प्रतिवादी क्र. 16 ते 21 यांचे दरम्यान आजतागायत सरस निरस मानाने तोंडी अथवा लेखी वाटप झालेले नव्हते व नाही. वर नमूद दावा मिळकतीमध्ये केवळ वर कलम 1एच या जमीन मिळकतीमध्येच प्रतिवादी क्र. 16 ते 21 यांना मालकीहक्क असल्यामुळे त्यांनादेखील सदर दाव्यात आवश्यक पक्षकार म्हणून समाविष्ट केलेले आहे.

15. दावा जमीन मिळकत 1अे यामध्ये वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 10 यांना कायदेशीर मालकीहक्क व अधिकार असुन सदर मिळकतीचे देखील वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 10 यांचे दरम्यान सरस निरस मानाने तोंडी अथवा लेखी वाटप झालेले नाही. सबब सदर मिळकतीचे वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 10 यांचे दरम्यान वाटप करून मिळणेकामी देखील सदर दावा वादीने दाखल केलेला आहे. सदर दावा कलम 1 अ मधील मिळकतीत वादी व प्रतिवादी नं. 1 व 3 यांना प्रत्येकी 1/16 तर प्रतिवादी नं. 2, 7 ते 10 यांना प्रत्येकी

3/40 तर प्रतिवादी नं. 4 ते 6 यांस प्रत्येकी 1/12 या अविभक्त मालकी हक्क व अधिकार हिस्सा आहे.

तसेच प्रतिवादी क्र. 1 व 2 यांचे घटक कुटुंबास मिळालेल्या पैशामधून प्रतिवादी क्र. 1 व 2 यांचे घटक कुटुंबाकरिता दावा कलम 1बी ते 1जी व 1आय व 1जे यामधील जमीन मिळकती प्रतिवादी क्र. 1 व 2 यांचे नावे खरेदी घेतलेले असल्याने सदर जमीन मिळकतीमध्ये केवळ वादी प्रतिवादी क्र. 1 ते 3 व 7 ते 10 यांना कायदेशीर मालकी हक्क व अधिकार प्राप्त झालेले आहेत व त्यांचे त्यांच्या दरम्यान सरस निरस मानाने तोंडी अथवा लेखी आजतागायत वाटप झालेले नाही. सदर दावा मिळकतीत वादी यांना प्रत्येकी 1/12 या अविभक्त मालकी हक्क व अधिकार होता व आहेत. तसेच प्रतिवादी नं. 1 व 3 यांना प्रत्येकी 1/12 या तर प्रतिवादी नं. 2 व 7 ते 10 यांना प्रत्येकी 1/10 अविभक्त मालकी हक्क व अधिकार होता व आहे. सबब दावा मिळकतीमधील वादी यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र तुटक व पृथकपणे वाटप करून मिळणेकामी वादीने सदरचा दावा प्रतिवादी क्र. 1 ते 3 व 7 ते 10 यांचे विरूध्द दाखल केलेला आहे. तसेच सदर मिळकतींमधील काही मिळकतीबाबत प्रतिवादी यांनी संगनमताने तथाकथित बोगस, बेकायदेशीर खरेदीखतावे, वाटपाचा असे पोकळीस्त दस्तऐवज वर नमूद केल्याप्रमाणे अस्तित्वात आणलेले असल्याने ते वादी यांचे सदर दावा मिळकतीमधील अविभक्त हिश्यावर बंधनकारक नसल्याने व ते मुळतःच बेकायदेशीर असल्याने त्याबाबत योग्य तो ठराव करून मिळणेकामी व त्या अनुषंगाने योग्य ते हुकूम मिळणेकामी सदरचा दावा दाखल केलेले आहे.

16. सदर वादी यांनी प्रस्तुतचा दावा वाटप, ठराव, ताकिद या कामी दाखल केलेला असून दावा जमीन मिळकती या शेत जमीन मिळकती असल्याने त्या जमीन मिळकतींची एकूण शेतसारा रक्कम रूपये 61. 47 पैसे इतकी होत आहे. वादीने सदरचा दावा वाटपासाठी केलेला आहे तसेच सदर दाव्यात ठराव व ताकीद याची देखील मागणी केलेली आहे. सबब ठराव व ताकीदीकामी वादीने दाव्याची आकारणी रक्कम रूपये 1,000/– + 1,000/– वर केलेली आहे. तसेच प्रतिवादी यांनी दावा जमीन मिळकती

संदर्भात तथाकथित पोकळीस्त व बेकायदेशीर खरेदीखताचे दस्त अस्तित्वात आणलेले असल्याने सदर दस्तऐवजामध्ये दर्शविलेली एकूण किंमत 12,07,50,000/- + 5,51,00,000/- = 17,58,50,000/- इतकी होत असून सदरचे दस्त वादी यांनी निष्पादित केलेले नसल्याने सदरचे दस्तऐवज रद्दबातल करून मिळणेकामी वादीने दाव्याची आकारणी सदर रकमेवर केलेली आहे व सदर दाव्यास मुंबई कोर्ट फी अधिनियमान्वये सर्वात जास्तीचा म्हणजेच रक्कम रूपये 3,00,000/- चा कोर्ट फी स्टॅम्प भरलेला आहे.

17. सदरील दावा जमीन मिळकती या मे. कोर्टाचे अधिकार क्षेत्रात स्थित असून प्रतिवादी देखील मे. कोर्टाचे अधिकार क्षेत्रामध्ये राहण्यास आहेत. सबब सदरचा दावा गुणदोषांवर चालविण्याचा तसेच त्याचा गुणदोषांवर अंतिम निकाल देण्याचा या मे. कोर्टास कायदेशीर हक्क व अधिकार आहे. त्यामुळे वादी यांनी सदरचा दावा या मे. कोर्टात दाखल केलेला आहे.

18. वादी यांचे दावा मिळकतीमधील हक्क व अधिकार डावलण्याकामी प्रतिवादी यांनी केलेली कृत्य पाहता सदर प्रतिवादी हे कोणत्याही थराला जाण्याची दाट शक्यता आहे तसेच दाव्याचा हेतू निष्फळ होण्यासाठी तसेच मल्टीप्लीसिटी ऑफ सूट अशी परिस्थिती निर्माण करण्यासाठी प्रतिवादी दावा मिळकतीचे मालक सदरी त्यांचे नावाची नोंद असल्याचे गैरफायदा घेवून अन्य तिऱ्हाईत इसमांस दावा मिळकती संदर्भात स्वतः अथवा त्यांचे नोकर चाकर व तर्फेच्या इसमांमार्फत हक्क व अधिकार निर्माण करण्याचा तसेच त्याअनुषंगाने दस्तऐवज अस्तित्वात आणण्याचीदेखील दाट शक्यता असल्याने वादी यांनी सदर दाव्यासोबत स्वतंत्र मनाई अर्ज देखील दाखल केलेला आहे.

**19. तरी वादी यांची मे. कोर्टास विनंती की,**

ओ. वादी यांचा दावा खर्चासह मंजूर करण्यात यावा.

बी. दावा कलम 1ओ यामधील जमीन मिळकत व 1के व एल मधिल इमारत मिळकती वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 10 यांची एकत्रात

अविभक्त मालकीहक्काची जमीन मिळकत व घर मिळकती आहेत असा ठराव करून सदर जमीन मिळकत व घर मिळकती मधील वादी यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र सरस निरस मानाने तुटक व पृथकपणे वादी यांचे ताब्यात देण्याबाबत हुकूम करण्यात यावा.

सी. दावा कलम 1बी ते 1जी, 1आय व 1जे मधील जमीन मिळकती या वादी व प्रतिवादी क्र. 1 व 2 यांचे घटक कुटुंबातील सदस्य म्हणजेच वादी व प्रतिवादी क्र. 1 व 3 आणि प्रतिवादी क्र. 2 व 7 ते 10 यांच्या संयुक्त मालकीहक्काच्या व ताबेवहिवाटीच्या जमीन मिळकती आहेत असा ठराव करण्यात यावा व सदर जमीन मिळकतीमधील वादी यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र वादी यांना सरस निरस मानाने तुटक व पृथकपणे वाटप करून देणेबाबत हुकूम करण्यात यावा.

डी. दावा कलम 1एच मधील 5 एकर 22 गुंठे म्हणजेच 2 हे 22 आर जमीन मिळकत वादी व प्रतिवादी क्र. 1 ते 10 आणि प्रतिवादी क्र. 16 ते 21 यांचे संयुक्त मालकीहक्काची जमीन मिळकत आहे असा ठराव करून सदर जमीन मिळकतीमधील वादी यांचे अविभक्त हिश्याचे क्षेत्र वादी यांना सरस निरस मानाने तुटक व पृथकपणे वाटप करून ताब्यात देणेबाबत हुकूम करण्यात यावा.

ई. प्रतिवादी क्र. 1, 2, 7, 8, 12, 13 यांनी प्रतिवादी क्र. 14 यांचेशी संगनमत करून दावा कलम 1 बी ते 1 एफ व 1 एच या जमीन मिळकतीमधील क्षेत्रामधील जमीन मिळकतीबाबत अस्तित्वात आणलेले व दुय्यम निबंधक हवेली क्र. 17 पुणे यांचे कार्यालयात अनुक्रमांक 753/2009 ते 758/2009 वर नोंदविलेले मान्यतापत्र व त्याबरोबरचे विसारपावतीचे तथाकथीत दस्त तसेच सदर कार्यालयात अनुक्रमांक 759/2009 ते 764/2009 वर नोंदविलेले खरेदीखताचे दस्त मूलतः बेकायदेशीर असून ते दावा मिळकतीवर तसेच दावा मिळकतीमधील वादी यांचे अविभक्त हिश्यावर मुळीच बंधनकारक नाहीत असा ठराव करून सदरचे दस्तऐवज रद्दबातल करण्याचा हुकूम करण्यात यावा.

एफ. दावा कलम 1एच यामध्ये कै. यमुनाबाई तुकाराम बहिरट यांचे मालकीची केवळ 5 एकर 22 गुंठे म्हणजेच 2 हे 22 आर व लक्ष्मीबाई गेणु वाघीरे हिची 5 एकर 22 गुंठे म्हणजेच 2 हे 22 आर इतकी जमीन मिळकत होती व असे असताना देखील प्रतिवादी नं. 1, 2, 12 व 15 यांनी संगनमताने सदर दावा मिळकती बाबत प्रतिवादी नं. 15 यास वाटपात 2 हे 44 आर व प्रतिवादी नं. 1, 2 व 13 यास 2 हे 00 आर क्षेत्र वाटप करुन दिल्याबाबतचा दुय्यम निबंधक हवेली नं. 17 पुणे यांचे कार्यालयात नोंदवीलेला वाटपपत्राचा दस्त क्र. 10824/2007 हा बेकायदेशीर आहे असा ठराव करण्यात यावा व तो रदद बातल करणेचा हुकुम व्हावा.

जी. दावा कलम 1एच यामध्ये कै. यमुनाबाई तुकाराम बहिरट यांचे मालकीची केवळ 5 एकर 22 गुंठे म्हणजेच 2 हे 22 आर जमीन मिळकत असताना व त्या मधिल 4 एकर म्हणजेच 1 हे 60 आर क्षेत्रफळाची मिळकत प्रतिवादी नं. 15 यांनी त्यांचे मुखत्यारामार्फत मे. धर्मराज प्रॉपर्टिज यांना प्रदान केलेली असताना व त्यामुळे प्रतिवादी नं. 15 यास केवळ 0 हे 62 आर क्षेत्रफळाची जमीन मिळकत शिल्लक असताना प्रतिवादी नं. 15 यांनी सदर दावा कलम 1एच मधिल 0 हे 84 आर क्षेत्रफळाच्या जमीन मिळकती बाबत दुय्यम निबंधक हवेली नं. 5 पुणे यांचे कार्यालयात अ. क्र. 4273/2011 वर नोंदणी करुन प्रतिवादी नं. 22 यांचे नावे अस्तित्वात आणलेला खरेदी खताचा दस्त मुलतः बेकायदेशीर असून तसा 0 हे 84 आर क्षेत्रफळाचा दस्त अस्तित्वात आणण्याचा त्यांना कायदेशीर हक्क व अधिकार नव्हता व नाही असा ठराव करुन सदर दस्त रदद बातल करण्याचा हुकुम व्हावा.

एच. दावा विनंती कलम 16 इ, 16 एफ व 16 जी या मध्ये विनंती केल्याप्रमाणे प्रतिवादी यांनी अस्तित्वात आणलेले तथाकथीत मान्यतापत्र, विसारपावती, खरेदीखते व वाटपपत्राचा दस्त रदद करण्याचा हुकुम होउन सदर हुकुमाची नोंद संबंधीत महसूल अधिकारी यांनी अधिकार अभिलेखात घेण्याबाबत योग्य तो आदेश देण्यात यावा.

आय. वादी यांचे दावा मिळकतीमधील ताबेवहिवाटीस प्रतिवादी क्र. 1, 2, 7, 8, 12, 13 व 14 यांनी हिल्ला हरकत करू नये तसेच प्रतिवादी क्र. 1, 2 व प्रतिवादी क्र. 14 व 22 यांनी दावा मिळकतीस त्यांच्या नावाच्या झालेल्या नोंदीच्या आधारे सदर दाव्याचा गुणदोषांवर अंतिमरित्या निकाल होईपर्यंत अन्य कोणत्याही तिऱ्हाईत इसमास स्वतः अथवा त्यांचे तर्फेचे इसम नोकर चाकर, मुखत्यार यांचे मार्फत कसल्याही प्रकारे हक्क व अधिकार निर्माण करू नयेत व त्याकामी कसल्याही प्रकारचे दस्तऐवज देखील करू नयेत असा मनाईचा हुकूम सदर प्रतिवादी यांचे विरूध्द करण्यात यावा.

जे. वादी यांचे विनंती कलम बी, सी व डी प्रमाणे प्रतिवादी यांनी वागणूक करण्यास कसूर केल्यास सदर हुकूमाची अंमलबजावणी होणेकामी मे. कलेक्टर साहेब यांची नेमणूक होणेबाबत योग्य तो हुकूम करण्यात यावा.

के. वादी यांना गरज असल्यास सदरचा दावा दुरूस्तीची परवानगी असावी.

एल. इतर योग्य ते न्यायाचे हुकूम वादी यांचे लाभात करण्यात यावेत.

स्थळ – पुणे

दिनांक – 03/11/2012

1.

2.

3.

4.

वादी

वादीतर्फे ॲडव्होकेट

## प्रतिज्ञालेख

आम्ही, 1. श्री. सागर भाऊसाहेब वाघेरे, वय – 26 वर्षे, व्यवसाय – शेती, 2. श्री. रंगनाथ भाऊसाहेब वाघेरे, वय – 28 वर्षे, व्यवसाय – शेती, 3. सौ. भाग्यश्री सुनिल काळे, वय – 31 वर्षे, व्यवसाय – गृहिणी व शेती, 4. सौ. गिता भाऊसाहेब वाघेरे, वय – 24 वर्षे, व्यवसाय – गृहिणी व शेती, क्र. 1 ते 4 राहणार – हरेकृष्ण मंगल कार्यालय, तपोवन मंदिरासमोर, पिंपरी, पुणे–411 017, सदरील वादी कारणे सत्य प्रतिज्ञेवर कथन करतात की, वरील दाव्यातील सर्व मजकूर आमचे माहिती व ज्ञानाप्रमाणे खरा व बरोबर असून तो मान्य असल्याबद्दल त्यावर आम्ही आजरोजी आपापल्या सहया केलेल्या आहेत.

1.

2.

3.

4.

वादी